# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील प्रमुख शहरात नगररचना योजनांच्या (टीपी स्कीम) अंमलबजावणीस विलंब होत असल्याबाबत

**(१) ४३७१ (१४-०९-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतिश चव्हाण : दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ४२२८७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रमुख शहरात नगररचना योजनांच्या (टीपी स्कीम) अंमलबजावणीस होणारा विलंब टाळण्यासाठी नगररचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाकडून टीपी स्कीमसाठी नविन धोरण आखण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संचालनालयाकडून पाच सदस्यीय विचारगट (थिंक टॅक) स्थापन करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विचारगट यासंदर्भातील नियमावली कधीपर्यंत तयार करणार आहे व त्याकरीता किती कालावधी निर्धारित करण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१) :** (१) नाही,

तथापि, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील तरतूदींनुसार नगर रचना योजना जलद गतीने तयार करण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शक सूचना तयार करण्याची बाब नगर रचना संचालनालयाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

(२) लागू नाही.

तथापि, संचालनलायामध्ये सर्वच महत्वाच्या व धोरणात्मक बाबींवर विचार विनिमय करण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावर एक विचारगट गठीत करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महादूला (तालुका.रामटेक, जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांचे धान पिकांचे चुकारे आदिवासी विकास महामंडळाने जमा न केल्याबाबत

**(२) १३४९१ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळाने नियुक्त केलेल्या महादूला (ता.रामटेक जि.नागपूर) या खरीप धानपीक विक्री केन्द्रावर सन २०२०-२०२१ या खरीप हंगामातील धान विक्री शेतकऱ्यांनी केली परंतु या केन्द्रातील २५ शेतकऱ्यांचे चुकारे अद्यापपर्यंत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले नाही, हे खरें आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच या शेतकऱ्यांचे ७/१२ ऑनलाईन करण्यासाठी काही कालावधीकरिता पोर्टल सुरू करण्याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयाने सबंधीत विभागास निदेश देऊनही अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या धानपीक शेतकऱ्यांची निकड व आर्थिक अडचण विचारात घेता शासन सबंधीत सर्व धान उत्पादक शेतकऱ्याना तातडीने चुकारा अदा करणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महादूला (ता.रामटेक जि.नागपूर) येथील २५ शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

महादुला (ता.रामटेक,जि.नागपूर) येथे आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था, भंडारबोडी संस्थामार्फत खरेदी केंद्र बर्डेपार या खरेदी केंद्रावर हंगाम २०२०-२१ मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशन झालेल्या २६६ शेतकऱ्यांकडून वजन ९४४०.८० क्विं. धानाची खरेदी करण्यात आलेली असून सदर शेतकऱ्यांचे चुकारे ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे. मात्र खरीप पणन हंगाम २०२०-२१ मधील धान खरेदीकरिता संबंधित संस्थेने सदर मुदतीत २५ शेतकऱ्यांचे ७/१२ NeML या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी न झाल्याने २५ शेतकऱ्यांना धानाचे चुकारे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेले नाही.
(२) हे खरे नाही.

शेतकऱ्यांचे ७/१२ ऑनलाइन करण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडून काही कालावधीसाठी NeML पोर्टल सुरू करणेबाबत आदिवासी विकास महामंडळास कोणतेही निर्देश प्राप्त झालेले नाहीत.
(३) व (४) खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी विक्रीकरिता आणलेला धान खरेदी करण्यापूर्वी शेतकऱ्यांचे ७/१२ ऑनलाईल पध्दतीने NeML पार्टलवर नोंद होणे आवश्यक असून त्यानुसारच शेतकऱ्यांचे धानाचे चुकारे त्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा केले जाते. खरेदी मुदत संपुष्टात आल्याने व केंद्र शासनाने विहीत मुदतीत ऑनलाईन नोंदणी न झाल्याने शेतकऱ्यांकडून खरीप पणन हंगाम २०२०-२१ मध्ये धान खरेदी करण्यास परवानगी देणे शक्य नसल्याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने कळविलेले आहे.

आदिवासी विकास महामंडळाने भंडारबोडी, बेडेपार (महादुला) खरेदी केंद्राला शेतकऱ्यांचा धान परत करणेबाबत कळविले होते. परंतु सदर संस्थाने धान गहाळ झाल्यामुळे परत केलेला नाही. धान गहाळ झाल्याबद्दल सदर संस्थेचे प्रशासक व संबंधितांवर पोलीस स्टेशन रामटेक येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना कृषीपंपाकरिता विज जोडणी न देताच हजारो रक्कमेची वीज देयके पाठविल्याबाबत

**(३) १४९५३ (०१-०८-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकरी श्री.कृष्णा धने यांनी सन २०१३ मध्ये कृषीपंपाकरिता विज जोडणीसाठी कोटेशन भरूनही मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यानपर्यंत विज जोडणी दिली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.धने यांना कृषीपंपाच्या वीजजोडणीकरिता कोणताही आकडा न टाकताही महावितरण कंपनीने त्यांना रुपये ४०,०००/- इतक्या रक्कमेचे देयक माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पाठविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास विज जोडणी करिता कोटेशन भरलेल्या व त्यांनी विजेकरिता आकडा टाकला किंवा नाही याबाबत कोणतीही खात्री न करता तर्कांच्या आधारे वैजापूर तालुक्यातील व राज्यातील हजारो शेतकऱ्यांना विजेची देयके पाठविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अन्याय झालेल्या शेतकऱ्यांना दिलेले कृषी पंपाचे बिल माफ करणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यात महावितरण आपल्या दारी ही योजना सन २०११-२०१२ पासून राबविण्यात आली. सदर योजनेंतर्गत वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकरी श्री.कृष्णा धने यांना दिनांक ०७/११/२०१३ रोजी (ग्राहक क्र. ४९९७०००१८५१) केबलव्दारे वीज जोडणी देण्यात आली आहे.
(२) ग्राहकाने वीज जोडणी सुरु केल्यापासून वीज देयकाचा भरणा न केल्याने माहे नोव्हेंबर २०१३ ते माहे मार्च २०२२ च्या देयकांची एकूण रक्कम रुपये ४३,०३०/- इतकी आहे. ज्यामध्ये "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत अनुज्ञेय सवलतीचा लाभ ग्राहकास देण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत

**(४) १५२७३ (२९-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेच्या हद्द वाढीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाकडे केव्हापासून प्रलंबित आहे व त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भुसावळ नगरपालिकेच्या हद्दवाढीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) जिल्हाधिकारी, जळगाव यांनी त्यांच्या दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव विभागास दिनांक ०४/०३/२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता, प्रस्तावित हद्दवाढ क्षेत्रातील लोकसंख्या, अकृषिक रोजगाराची टक्केवारी व नगररचना विभागाचे अभिप्राय अप्राप्त असल्याने, या सर्व बाबींचा समावेश करुन, ठोस कारणमिमांसा व समर्थनासह, तसेच आवश्यक कागदपत्रांसह महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार, परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांना दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने सुधारीत प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात प्रदूषण करणाऱ्या कर्नाटका एम्टा कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(५) १५६८० (२९-१२-२०२२) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कर्नाटका एम्टा, माजरी परिसरात कोळसा खाणीतील कोळसा वाहतुकीमुळे प्रदूषण निर्माण होवून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम व शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होत असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रदूषण करणाऱ्या कर्नाटका एम्टा कंपनीवर कारवाई करुन प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून दिनांक ३०/११/२०२२ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार भद्रावती तालुक्यातील माजरी येथील प्राथमिक ओराग्य केंद्राच्या माहितीनुसार मागील ३ वर्षांपासून परिसरातील नागरीकांच्या विविध आजाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नसल्याचे नमूद केलेले आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार मे. कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लि., इंटीग्रेटेड बरांज ओपनकास्ट खाणीच्या प्रदूषणामुळे परिसरातील कृषी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी वरोरा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचे निर्देश दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिले होते. तसेच या विषयी सुस्पष्ट अहवाल दिनांक ३०/१२/२०२२ पर्यंत सादर करण्याचेसुद्धा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी आदेशित केलेले आहे. त्यानुसार कृषी विभागाकडून कार्यवाही सुरू आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर खाणीस दिनांक १५/०८/२०२२ रोजी संमतीपत्र प्रदान केले असून संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे खाणीची रुपये २५.०० लक्षची बँक हमी दिनांक ०६/१०/२०२२ रोजी जप्त करण्यात आलेली आहे. दिनांक ०४/०१/२०२३ रोजीच्या प्राप्त तक्रारीनूसार मंडळाकडून उद्योगाची मौका पाहणी केली असुन त्यानुसार आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगास दिनांक १०/०१/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली असून दिनांक १७/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित निर्देश देखील बजाविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे उद्योगाची रुपये २०.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हलबा समाजाच्या जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यातील अडचणी दूर करणेबाबत

**(६) १५८८५ (२८-१२-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १२६२२ ला दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नागपुरात असणाऱ्या हलबा या अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना क्षेत्र बंधन घटना दुरुस्ती झाल्यानंतरही प्रमाणपत्र मिळत नसल्याची बाब ऑक्टोबर २०२२ मध्ये निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हलबा समाजाच्या जात वैधतेमधील अडचणी सोडवण्यासाठी शासनाने संशोधन समिती गठीत करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी लेखी मागणी केली आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन हलबा समाजाच्या समस्या सोडविण्याकरिता उच्च समिती निर्माण करणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता “महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० लागू केले आहे. व त्यानुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ लागू केले आहे. सदर अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) व (३) असे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. मात्र अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये "हलबा कोष्टी" अशी सुधारणा करण्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाची बैठक घेणेबाबत

**(७) १५९५२ (२९-१२-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्याच्या विकासासाठी औरंगाबाद येथे दोन दिवसीय मंत्रिमंडळाची बैठक घेवून मराठवाड्यातील प्रलंबित प्रश्न व विकासकामे यांचा निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांना प्रत्यक्ष भेटून केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील अनेक काळापासून सदरील बैठका होत नसल्याने मराठवाड्यातील प्रश्ने व विकास कामे प्रलंबित असल्याने मा.मुख्यमंत्री महोदय यांनी औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाची बैठक घेण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संपूर्ण राज्यासाठी विविध विकास कामे हाती घेण्यात येत असून त्यामध्ये मराठवाड्यातील विकास कामांचादेखील समावेश आहे. त्यामुळे बैठका होत नसल्याने मराठवाड्यातील प्रश्ने व विकास कामे प्रलंबित असल्याची वस्तुस्थिती नाही. तसेच औरंगाबाद येथे मंत्रिमंडळ बैठक घेण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जेष्ठ नागरीक असुरक्षित असल्याबाबत

**(८) १६१८४ (२८-१२-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५४९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वृध्दांवरील अत्याचाराबाबत ६ हजार १९० गुन्हयांची नोंद झाली असल्याचे नॅशनल क्राईम रेकार्ड ब्युरोच्या २०२१ च्या अहवालानुसार आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यात मुंबईतील वृध्दांवरील अत्याचाराचे एकूण ९८७ गुन्हयांची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने सदर वृध्दांवरील अत्याचाऱ्यांचा आढावा घेऊन राज्यातील व मुंबईतील वृध्दावरील अत्याचार तातडीने रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) राज्यातील वृध्द नागरीकांच्या सुरक्षिततेबाबत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-
१. ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारीचे त्वरीत निवारण करण्याच्या सूचना पोलीस स्टेशन प्रमुखांना देण्यात आल्या असून प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर ज्येष्ठ नागरिक सेल स्थापन करण्यात आले आहेत.
२. प्रत्येक पोलीस ठाणेच्या हद्दीत वृध्दांच्या मदतीसाठी ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष स्थापन केला आहे, ज्येष्ठ नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून त्वरीत मदत व्हावी याकरिता सातत्याने कारवाई व उपाय योजना केलेल्या आहेत.
३. एकटे राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांच्या घरी भेटी देऊन त्यांच्या अडीअडचणींची विचारपुस करुन त्यांना मानसिक आधार देण्यात येतो.
४. डायल ११२, तसेच १०९० हेल्पलाईनवर जेष्ठ नागरिक यांना तात्काळ मदत पुरविण्यात येते. घटकात वृध्दांवरील अत्याचाराबाबत कोणताही गुन्हा घडुन आल्यास त्यांना सन्मानपुर्वक वागणुक देऊन तात्काळ कार्यवाही केली जाते.
५. कम्युनिटी पोलीसींग योजना, जेष्ठ नागरिक कक्ष, जेष्ठ नागरिक नावांची नोंदणी रजिस्टर, इ. योजना घटकातील काही पोलीस ठाणे स्तरावर राबविण्यात येतात.
६.ज्येष्ठ नागरिक अर्जदार व गैरअर्जदार यांचे समुपदेशन करुन त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले जाते तसेच काही पोलीस घटकात ज्येष्ठ नागरिकांचे व्हाट्सॲप ग्रुप तयार करण्यात आले असून त्याद्वारे त्यांची विचारपुस करुन त्यांना मानसिक आधार देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथील उद्यानाखाली वाहनतळ उभारण्याबाबत

**(९) १६८४१ (२९-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२७२५ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथील उद्यानाखाली वाहनतळ उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि शासनास दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी व तद्नंतर सातत्याने लेखी निवेदनाद्वारे मागणी करुनही महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा निर्णय घेऊन संबंधितांना आदेश देऊनही ठाकूर व्हिलेज, कांदवली पूर्व येथील उद्यानाखाली वाहनतळ उभारण्यात आले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० च्या भांडवली अर्थसंकल्पामध्ये उद्यान खात्यांतर्गत लेखा संकेतांक - ५०४१००६९६ (ठाकूर गाव उद्यानाखाली भूमिगत वाहनतळ करिता तरतूद) अंतर्गत अनुक्रमे रुपये १कोटी व रुपये १० लाख इतकी ठोक तरतूद करुन वाहनतळाच्या उभारणीसाठीच्या कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाबतीत आयुक्तांच्या दालनात दिनांक ७/०८/२०१९ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेसोबत झालेल्या संयुक्त बैठकीत आयुक्तांनी "प्रायोगिक तत्त्वावर एका मैदानामध्ये भुमिगत वाहनतळ BOT तत्वावर बनविण्यासाठी प्रस्ताव सादर करावे, महानगरपालिका वास्तुविशारद यांनी आराखडे तयार करावे व नगर अभियंता यांनी निविदा मागवून तातडीने कार्यवाही करावी" असे आदेश देवूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकास नियोजन विभागामार्फत ठाकुर व्हिलेज येथील २ विकासक हे बृहन्मुंबई महानगरपालिकेस त्यांच्या बांधकामातील २ मजले वाहनतळाची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करुन त्यामध्ये एकूण २९७ वाहनांची जागा उपलब्ध होणार असल्याचे कळविल्यानुसार वाहनतळ उपलब्ध करुन देण्यात आले आहेत काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथील उद्यानाखाली वाहनतळ उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) येथे भूमिगत वाहनतळ विकसित करण्याच्या संभाव्यतेची तपासणी करण्यासाठी दिनांक २६/११/२०२० रोजी करण्यात आलेल्या संयुक्त पाहणीत कांदिवली (पूर्व) येथील दादोजी कोंडदेव मैदान, ठाकूर व्हिलेज येथील न.भू.क्र. ८०९/ए/१/१२, ८०३/ए/१/१३ या भूखंडावर भूमिगत वाहनतळ उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते.

तथापि, ठाकूर व्हिलेज येथील २ विकासक हे त्यांच्या बांधकामातील २ मजले वाहनतळाची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करणार आहेत. त्यानुसार एकूण २८३ वाहनांची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.
(४) व (५) स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर उद्यानाखाली वाहनतळ उभारण्यासाठी मागणी केलेल्या उद्यानाच्या सभोवतालच्या परिसरात ४ भूखंडांवर वाहनतळाचे आरक्षण आहे, त्यापैकी दोन भूखंडांवर दिनांक १२/०२/२०२२ रोजीच्या सुधारीत मंजुरीनुसार मौजे पोयसर येथील न.भू.क्र. ८०९अ/१/१/७ व ८०९अ/१/१९अ/१/६ या भूखंडांवर समायोजन आरक्षणांतर्गत अनुक्रमे १०६ व १७७ अशा एकूण २८३ वाहनांची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

सदर दोन भूखंडांपैकी न.भू.क्र. ८०९अ/१/१९अ/१/६ या भूखंडावर विकासकाने वाहनतळाचे हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०८/०८/२०१२ रोजी दिला असून त्यास विधी विभागाकडून मालकी हक्क पडताळणी झालेली आहे. परंतु सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्याने त्याचा ताबा अद्याप घेतलेला नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक केंद्र बांधण्यासाठी राखीव ठेवलेल्या भूखंडाबाबत

**(१०) १६८४८ (२९-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आकुर्ली (जि.मुंबई उपनगर) येथील सर्व्हे क्रमांक ८६ नगर भूमापन १७१/१/अ/२० या भूखंडावर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर नालंदा व बुध्द भवन समिती या संस्थांची बुध्द विहार वास्तू गत ४० वर्षापासून असून याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक केंद्र बांधायला हरकत नसल्यामुळे भूखंड आरक्षित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ डिंसेबर, २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे स्थळांचा विकास करणे अशी योजना शासनाने सुरु केली असून या योजनेंतर्गत सदर भूखंड डॉ.बाबासाहेब आंबेडकर नालंदा व बुध्द भवन समितीला वितरित करावा, अशी मागणी सदर समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक केंद्र बांधण्यासाठी राखीव ठेवलेला भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तीचे स्मारक बांधणे तसेच सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे स्थळांचा विकास करणे या योजनेतंर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक केंद्र बांधकामाकरिता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर नालंदा व बुध्द भवन समिती या संस्थेचा प्रस्ताव शासनाच्या विचारधिन आहे.

---

## भिवंडी मनपा मुख्यालयासमोर १४ वर्षीय विद्यार्थ्यांनी “ पाकिस्तान झिंदाबाद “ च्या घोषणा दिल्याबाबत

**(११) १७१६४ (२५-०३-२०२३) श्री.महादेव जानकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथील शिक्षा सुधार समितीच्या वतीने भिवंडी मनपा मुख्यालयासमोर आयोजित केलेल्या “मेरी पाठशाला” आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या एका १४ वर्षीय विद्यार्थ्यांनी “पाकिस्तान झिंदाबाद” च्या घोषणा दिल्याची घटना दिनांक २/१/२०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) त्यानुषंगाने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी आंदोलनाच्या कार्यक्रमास परवानगी नाकारली असतानाही आरोपी व इतर १६ तसेच लहान शाळकरी मुलांना घेऊन आंदोलन केल्यामुळे त्यांच्याविरुध्द भिवंडी शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.०००४/२०२३ भा.दं.वि. क १८८, ३४ सह मपोका क ३७(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपिंविरुध्द सीआरपीसी क १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

सदर विद्यार्थी अल्पवयीन असल्याने त्याचेविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नसून चौकशीमध्ये त्याला कोणीही सदर घोषणा देण्याबाबत सांगितले नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## शासकीय अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील मानधन तत्वावर नियुक्त शिक्षकांना कायम सेवेत करणेबाबत

**(१२) १७३५७ (२५-०३-२०२३) श्री.किशोर दराडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अनुदानित आदिवासी आश्रम शाळेमध्ये मानधन तत्ववार शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेत मानधन तत्वावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना कालांतराने कायम करणे गरजेचे असताना त्यांना पदे रिक्त नसल्याचे कारण दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या आदिवासी आश्रम शाळेत मानधन तत्वावर काम केलेल्या शिक्षकांना सेवेत सामावून घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१६-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये मानधन तत्त्वावर शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे, खरे नाही.

(३) व (४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये आदिवासी विकास विभागातील आश्रमशाळा/वसतिगृहातील सलग १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या रोजंदारी/तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार शासन सेवेत नियमित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

## बोईसर पूर्व (जि.पालघर) येथील गुंदले गावातील किसान मोल्डिंग कंपनीमध्ये कामगार नेते कंपनी व्यवस्थापनेकडे खंडणीची मागणी करीत असल्याबाबत

**(१३) १७४४५ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर पूर्व (जि.पालघर) येथील गुंदले गावाच्या हद्दीत असणाऱ्या किसान मोल्डिंग कंपनीमध्ये कामगार नेते कंपनी व्यवस्थापनेवर दबाव टाकून खंडणीची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार नेत्याकडून होणारी खंडणीची मागणी आणि दबावतंत्रापासून संरक्षण मिळावे यासाठी कंपनी व्यवस्थापनाने प्रशासकीय यंत्रणा आणि बोईसर पोलिसांकडे मदतीची मागणी करूनहि त्यांचेकडून अपेक्षित सहकार्य लाभत नसल्याने व वर्षभरात ५० पेक्षा अधिक वेळा काम बंद आंदोलने झाल्याने कंपनीचे उत्पन्न निम्म्याने घटल्याने कंपनीची आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याने कंपनी बंद करण्याचा विचार कंपनी व्यवस्थापनाकडून केला जात आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची कंपनी बंद झाल्यास ४०० कामगार बेरोजगार होऊन त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कंपनीच्या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत तसेच खंडणीची मागणी करीत असलेल्या कामगार नेत्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०२३) :** (१) होय.

बोईसर पोलीस स्टेशन, पालघर येथे किसान मोल्डिंग कंपनीमध्ये कामगार नेते कंपनी व्यवस्थापनेवर दबाव टाकून खंडणीची मागणी करीत असल्याप्रकरणी दोन आरोपींविरुध्द दिनांक १८/१/२०२३ रोजी भारतीय दंड संहिता कलम ३८६, ३४ अन्वये गु.र.क्र. २८/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) किसान मोल्डिंग लि. कंपनीमधील कामगार यांनी त्यांचे विविध मागण्या संदर्भाने युनियनचे मार्फत करण्यात आलेल्या संपाच्या अनुषंगाने एकूण ४० वेळा कंपनीस कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आलेला होता.तसेच बीट पेट्रोलिंग नेमण्यात आली होती. कामगारांच्या मागण्यांच्या संदर्भाने वेळोवेळी कामगार आयुक्तांसोबत चर्चा करुन तोडगा काढण्यात आला असून कंपनीचे कामकाज व्यवस्थीत चालू आहे.

(४) बोईसर पोलीस स्टेशन, पालघर येथे किसान मोल्डिंग कंपनीमध्ये कामगार नेते कंपनी व्यवस्थापनेवर दबाव टाकून खंडणीची मागणी करीत असल्याप्रकरणी दोन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना मा.उच्च न्यायालयाकडून अटक पूर्व जामीन मिळालेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या आवारात शेकडो भंगार वाहने अनेक वर्षापासून पडून असल्याबाबत

**(१४) १७८७९ (२५-०३-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या आवारात शेकडो भंगार वाहने अनेक वर्षापासून पडून असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यालयाच्या मागील ६ एकर विर्स्तीण पसिरात अनेक महिन्यांपासून स्कॉपिओ, बोलेरो, जीप आदि वाहनांचा समावेश आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाहने पडून राहण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सन २०१३ ते २०२२ या कालावधीतील निकामी केलेली परंतु लिलाव न झाल्याने स्कॉर्पिओ, जीप, मोटार सायकल व लाईट व्हॅन ही वाहने, मोटार परिवहन विभागाकरीता स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्याने, पोलीस मुख्यालयातील उपलब्ध असलेल्या जागेमध्ये उभी आहेत.
(४) सन २०१६ मध्ये मे एम.एस.टी.सी.लिमीटेड महामंडळामार्फत राबविण्यात आलेल्या ई-लिलावामध्ये रायगड जिल्हा आस्थापनेवरील वाहने विक्री न झाल्याने सदरची वाहने व सन २०१७ ते २०१९ पर्यंतची निकामी वाहने लिलावास प्रतिसाद न लाभल्याने विक्रीअभावी पडून आहेत.

निकामीकरणास पात्र असलेली मोटार वाहने, मोटार वाहनांवरून काढलेले जुने सुटे भाग / साहित्य, टायर-ट्युब्ज बॅटरीज् तसेच जळके वंगण तेल इत्यादींचे ई-लिलावाद्वारे विक्री करण्यास केंद्रशासन अंगिकृत मे. एमएसटीसी लिमीटेड महामंडळाला गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २३/०३/२०२३ अन्वये पाच वर्षाकरीता नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली असून आगामी काळात घटकस्तरावर ई-लिलाव प्रक्रीया पार पाडून निकामी वाहनांची विक्री झाल्यावर या वाहनांनी व्यापलेली जागा रिक्त होईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

**(१५) १७९५८ (२५-०३-२०२३) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात २५३ अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यात सनदी अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने जनतेची अनेक कामे प्रलंबित असून त्याचा परिणाम जिल्ह्याच्या विकासावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील मंजूर १३८२ पदांपैकी ९८३ पदे भरलेली असून ३९९ पदे रिक्त आहे.

राज्य शासनाच्या ७५ हजार पदे भरती मोहिमेअंतर्गत उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, लघुलेखक निम्नश्रेणी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक व तलाठी संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने, थेट भरतीव्दारे आणि पदोन्नतीने भरण्याची प्रक्रीया सुरु आहे.

तसेच, प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व जनतेची गैरसोय टाळण्यासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांकडे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटकोपर, मुंबई येथील रमाबाई आंबेडकर नगरामधील `बहुद्देशीय केंद्र' वापराविना पडून असल्याबाबत

**(१६) १८०३८ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटकोपर, मुंबई येथील रमाबाई आंबेडकर नगरामध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) सुमारे रुपये ५ कोटी ७१ लाख खर्च करून माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झोपडपट्टीतील जनतेसाठी बहुद्देशीय केंद्र बांधले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या `बहुद्देशीय केंद्रात' कोणत्याही मूलभूत सोयी-सुविधा तसेच या प्रकल्पाला भोगवटा प्रमाणपत्र मिळू न शकल्याने हे बहुद्देशीय केंद्र मागील ५ वर्षांपेक्षा अधिक काळ वापराविना पडून असल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दप्तर-दिरंगाई व अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे करारनामा होऊ शकलेला नाही हे ही खरे आहे काय,असल्यास यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली तसेच उपरोक्त बहुद्देशीय केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे. म्हाडाचा घटक मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत बहुद्देशिय केंद्राचे बांधकाम करण्यात आले असून, सदर बांधकाम सन २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. त्यासाठी रुपये ६.८० कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या I.O.D. मधील अट क्रमांक ४ व ५ नुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यात करारनामा न झाल्याने, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. तथापि, स्थानिक रहिवाशी या बहुद्देशिय

केंद्राचा वापर करीत असल्याचे दिसून येते.

भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## कोपऱ्याची वाडी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील आदिवासी मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१७) १८२९८ (२५-०३-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपऱ्याची वाडी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील आदिवासींना मुलभूत सुविधा प्रशासनाकडून मिळत नसल्याने स्थानिक गावकऱ्यांनी अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही प्रशासनाकडून दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोपऱ्याच्या वाडीला मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) कोपऱ्याची वाडी येथे पेव्हर ब्लॉक अंतर्गत रस्ता करण्यात आला असून विद्युतीकरण झालेले आहे. सदर आदिवासी वस्तीत अंगणवाडी व इ. ५ वी पर्यंत जिल्हा परिषदेची शाळा आहे. तसेच सदर वाडीपासून ७ कि.मी. अंतरावर मंगळूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. सदर वाडीत ठक्कर बाप्पा योजनेतून क्रॉक्रीटीकरण करून अंतर्गत रस्ता तयार करण्यात आलेला असून जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत येथे लघु नळ पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आलेली आहे.

---

## विकासकांवर महारेरा अतंर्गत कारवाई करण्याबाबत

**(१८) १८३८४ (२५-०३-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार पनवेल यांच्या कार्यालयात विविध गृहप्रकल्पामध्ये विकासकांकडून घरांचा ताबा वेळेत न देणे, प्रकल्प अर्धवट सोडणे, गुणवत्तेचा अभाव अशा विविध प्रकारच्या २७ तक्रारी आल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महारेराच्या अंतर्गत विकासकांवर कारवाई करण्याबाबत माहे जानेवारी,२०२३ अखेरपर्यंत किती तक्रारी प्राप्त झाल्या तसेच किती विकासकांवर कारवाई करण्यात आली व त्यांची नांवे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त विकासकांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०२३) :** (१), (२) व (३)

रायगड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार पनवेल यांच्या कार्यालयात विविध गृहप्रकल्पामध्ये विकासकांकडून घरांचा ताबा वेळेत न देणे, प्रकल्प अर्धवट सोडणे, गुणवत्तेचा अभाव अशा विविध प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत. तथापि, जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयाकडे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांचे कार्यालयाकडून जानेवारी २०२३ अखेर एकूण ९९ महसूल वसूली प्रमाणपत्रे प्राप्त झाली. त्यापोटी एकूण रुपये १९.९८ कोटी एवढी रक्कम वसूल करावयाची असून ४६ प्रकरणांमध्ये अंशत: रुपये ५.५७ कोटी व १ प्रकरणामध्ये रुपये ०.२१ कोटी अशी एकूण ४७ प्रकरणांमध्ये रुपये ५.७८ कोटी एवढी वसूली करण्यात आली आहेत. तसेच, १४ प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. उर्वरित वसूली प्रमाणपत्रांबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील शासकीय जागेत अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१९) १८४३२ (२५-०३-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार नायब तहसिलदार यांनी ग्रामपंचायत हद्दीतील रेवदंडा मोठेबंदर येथील श्री.सुरेल ताराचंद्र कोंडे रा.थेरोंडा यांनी अनाधिकृत बांधलेले बांधकाम व बेकायदेशीर उभारलेले तंबू जे.सी.बी. द्वारे नष्ट करण्यात येऊनही श्री.कोंडे यांनी पुन्हा मोठे बंदर रेवदंडा समुद्रकिनारी असलेल्या ५ एकर शासकीय जागेत बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.कोंडे यांनी शासकीय जागेत बांधकाम करताना संबंधित विभागाची व रेवदंडा ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे तंबू उभारण्यात येणे, पर्यटकांना बेकायदेशीरपणे भाड्याने देणे, रेव्ह पार्टी सुरू करणे, रात्रभर डिजे लावणे इ.अवैध व्यवसाय सुरु असल्यामुळे परिसरात राहणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय जागेचा यापुर्वी गुरे चरण्यासाठी वापर केला जात होता, परंतु सदर अनधिकृत बांधकामामुळे गुरांना चरण्यासाठी जागा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय जागेत विनापरवानगी अनधिकृत बांधकाम करणाऱ्या श्री.कोंडे यांचेवर तसेच सदर जागेवर सुरु असलेले अवैध व्यवसाय बंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१०-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) श्री.सुरेल ताराचंद्र कोंडे यांनी मौजे रेवदंडा ता.अलिबाग गावाच्या हद्दीतील समुद्र किनारी सरकारी जागेत कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेता अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत तसेच अनधिकृतपणे तंबू टाकून पर्यटकांना बेकायदेशीरपणे भाड्याने देणे, रेव्ह पार्टी सुरु करणे, रात्रभर डिझे लावणे इ. अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत तक्रार श्री.सुरेखा सुरेश हाडकर व इतर ग्रामस्थ मोठे बंदर, रेवदंडा ग्रामस्थ यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दिनांक १६/०१/२०२३ च्या पत्रान्वये केली आहे.

त्यानुषंगाने तहसिलदार, अलिबाग यांनी तपासणी अंती श्री.सुरेल कोंडे यांनी मौजे रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यंथील स.नं.२५४ क्षेत्र ४-२५.० हे.आर कब्जेदार सदरी मळई जमीन नोंद असलेल्या जमिनीपैकी ४५-५० गुंठे क्षेत्रावर अतिक्रमण केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत अनधिकृत बांधकामधारक यास उक्त बांधकाम निष्कासित करण्याबाबत तहसिलदार, अलिबाग यांनी दिनांक २०/०३/२०२३ अन्वये नोटीस बजावली. सदर अतिक्रमण स्वत: दूर न केल्याने तहसिलदार अलिबाग यांनी पथक नेमून दिनांक १९/०५/२०२३ रोजी सदर बांधकाम दूर करण्यात आले आहे. तसेच उक्त अनधिकृत बांधकामाबाबत तहसिलदार, अलिबाग यांनी अतिक्रमणधारक यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ व त्याखालील पोटनियम अन्वये रुपये १,३८,३७५/- इतकी दंडात्मक रक्कम शासन जमा करणेबाबत सूचित केले असून सदर रक्कम वसूल करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## मीरा रोड येथील भक्ती वेदांत या धर्मादाय रुग्णालयात रुग्णांना वाजवी दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) १८७८७ (१९-०६-२०२३) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भक्ती वेदांत धर्मादाय रुग्णालय हे मीरा रोड येथे सन १९९८ मध्ये सुरु करण्यात आलेले असून या रुग्णालयातील डॉक्टर तपासणी शुल्कात, तसेच पॅथॉलॉजी शुल्कात सद्य:स्थितीत तीन पटीने वाढ करण्यात आल्याने गोरगरीब जनतेची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मीरा रोड येथील भक्ती वेदांत या धर्मादाय रुग्णालयात रुग्णांना वाजवी दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०२३) :** (१) नाही. शुल्कवाढीबाबत सदर रुग्णालयाविरुध्द कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.